# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

**विषय : पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेशपात्रतेबाबत**

उपरोक्त विषयास अनूसरुन आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व अधिविभागामध्ये पदवी / पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यानी ज्या त्या अभ्यासक्रमामधील पात्रतेच्या नियमानुसार पात्रता पूर्ण करून घेणे आवश्यक असते. पात्रता पूर्ण झालेशिवाय संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश अंतिम होत नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे विद्यापीठाकडुन पात्रता प्रलंबित राहिल्याने निकाल राखीव ठेवले जातात व यातून पुढे न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवतात.

शैक्षणिक वर्ष 2018–19 मध्ये सर्व पदवी, पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज online भरून त्याची स्वाक्षरीची प्रत योग्य त्या शुल्कासह विद्यापीठ कार्यालयात जमा करण्याच्या अंतिम तारखां सोबत **(परिशिष्ट अ)** मध्ये दर्शविल्या आहेत. त्याप्रमाणे पात्रता अर्ज विहीत शुल्कासह विहीत मुदतीत जमा करण्यात यावेत. जी महाविद्यालये मुदतीत पात्रता शुल्क online विद्यापीठाच्या खात्यावर जमा करतात, परंतु पात्रता अर्ज विहीत मुदतीत सादर करत नाहीत, त्यांना विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार विशेष दंड आकारणेत येईल, याची नोंद घ्यावी.

पात्रता अर्ज सादर करणेबाबतच्या अंतिम तारखा व शुल्क दर्शविणारा तक्ता, मार्गदर्शक सूचना, मान्यताप्राप्त बोर्डाच्या, विद्यापीठांच्या याद्या, एम.फील. / पी.एच.डी. प्रवेशपात्रतेबाबतची माहिती, परदेशी विद्यार्थी प्रवेशपात्रतेची माहिती, विद्यापीठ अनुदान आयोगाची प्रवेशाबाबतची अधिसुचना, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण महामंडळाकडून प्राप्त झालेल्या समकक्ष अभ्यासक्रमांच्या याद्या, बनावट विद्यापीठांची यादी इ. माहिती सोबत जोडली असून त्याचे अवलोकन करून प्रवेशाबाबत योग्य ती कार्यवाही करणेत यावी. तसेच यासंदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारे शासन निर्णय व इतर शासकीय आदेश / परिपत्रके लागू राहतील, याची नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in (Eligibility) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून ते सर्व संबंधित शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

**जा. क्रं. / शिवाजी वि / पात्रता / 74**

**दि.** 18 JUN 2018

आपला विश्वासू,

कुलसचिव

(डॉ.व्ही. डी. नांदवडेकर)

**प्रति,**

1. प्राचार्य / संचालक,
   सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
2. विभागप्रमुख / संचालक / समन्वयक, सर्व पदव्युत्तर अधिविभागप्रमुख

c:\users\dell\downloads\circular 2018 (autosaved) (1).docx

**<u>Online पात्रता अर्ज भरणेबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे :</u>**

**A. प्राचार्य / प्रवेश समितीसाठी प्रवेश पात्रताबाबतच्या मार्गदर्शक सूचना :–**

1) शैक्षणिक वर्ष 2018–19 मधील प्रवेशित सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज online.shivajiuniversity.in **या** पोर्टलमधूनच भरावयाचे आहेत. online form भरत असताना **विशेषतः बारावी बोर्डाचा बैठक क्रमांक, वर्ष व उत्तीर्णचा शेरा अत्यंत बिनचुकपणे लिहीणे आवश्यक आहे.** अर्जाची online प्रिंट सर्व कागदपत्रांसहित विद्यापीठाकडे सादर करावयाची आहे. आवश्यकतेनुसार On-line पात्रता अर्ज भरून घेणेबाबतची माहिती आयटी सेल, परीक्षा विभागाकडून घ्यावी.

2) प्राचार्य / **प्रवेश** समिती यांनी **प्रवेश** देताना सबंधित विद्यार्थी ज्या–त्या अभ्यासक्रमास नियमानुसार पात्र आहे, का याची खात्री करूनच विद्यार्थ्यांना **प्रवेश** द्यावा. पात्रतेच्या online प्रिंटवर प्राचार्यांनी स्वाक्षरी करणेपुर्वी **प्रवेश** समितीने प्रवेश अंतिम केला असल्याची खात्री करावी. अपात्र विद्यार्थ्याचे प्रवेशपात्रता अर्ज विद्यापीठाकडे पाठविण्यात येवू नयेत, असे निदर्शनास आलेस याबाबत काही प्रश्न निर्माण झालेस त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही होणा–या परिणामांची संपूर्ण जबाबदारी संबधित महाविद्यालय व प्राचार्यावर राहिल.

3) प्रवेशपात्रता अर्जासोबत Marksheet, Transfer certificate, Cast certificate, Migration Certificate अशी आवश्यक ती साक्षांकित कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अपुर्ण पात्रता अर्ज अथवा शुल्क नसलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विद्यापीठात पाठविण्यात येवू नयेत, अशा अर्जांची दखल घेतली जाणार नाही आणि त्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही व यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

4) अन्य विद्यापीठातून थेट द्वितीय किंवा तृतीय वर्षास (अभियांत्रिकी विद्याशाखा व्यतिरिक्त) प्रवेश घेणा–या विद्यार्थ्याचे पात्रता अर्ज स्वतंत्रपणे मुखपत्रासह आवश्यक कागदपत्रे व शुल्कासह पाठविण्यात यावेत. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज एकत्रित गठ्ठयातून पाठविण्यात येवू नयेत. त्यामुळे विद्यापीठास अशा विद्यार्थ्यांची पात्रता वेळेत मंजूर करता येणे शक्य होईल. तेव्हा याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

5) अन्य विद्यापीठातून / बोर्डातून आलेल्या विद्यार्थ्यांच्या (महाराष्ट्रातील, भारतातील) **प्रवेश** घेणा–या विद्यार्थ्यांचे original Migration Certificate व Transfer Certificate अभावी पात्रता अर्ज महाविद्यालयात न ठेवता विद्यार्थ्यांचे हमीपत्र घेवून विहित मुदतीत विद्यापीठाकडे पाठवावे व महाविद्यालयांनी original Migration Certificate व Transfer Certificate बाबत पाठपूरावा करावा. original Migration Certificate प्राप्त झाल्याशिवाय त्याची पात्रता अंतिम केली जाणार नाही. तसेच अशा विद्यार्थ्याबाबतची माहिती स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

6) परदेशी विद्यार्थ्यांच्या **प्रवेश** पात्रतेबाबतची नियमावली सोबत जोडली असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

7) संबंधित महाविद्यालयात/अधिविभागात प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश काही कारणास्तव रद्द झाले तर त्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज विद्यापीठाकडे पाठविण्यात येऊ नयेत. उशिरा / **प्रवेश** रद्द झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती त्वरीत प्रथम सत्र संपण्यापूर्वी पात्रता विभागास कळविणे आवश्यक आहे.

8) नियमित अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ नियमानुसार हजेरीबाबत अट लागू असल्याने पूर्ण वेळ नोकरी करणा–या विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासक्रमास प्रवेश

देण्यात येऊ नयेत. त्याप्रमाणे सदर बाब पडताळणी करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहिल.

9) विहित मुदतीत कागदपत्रांची पडताळणी करुन प्रवेश पात्रतेची कार्यवाही न झाल्यास यामुळे उद्‌भवण्या–या कायदेशीर बाबींची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालय / अधिविभाग यांची राहिल.

**B. दूरशिक्षण अंतर्गत अभ्यासक्रम पूर्ण करून पुढील प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतः–**

1) युजीसी, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक तत्वानुसार पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता 10+2 किंवा समकक्ष (भारतातील व महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ सेकंडरी ॲण्ड हायर सेकंडरी एज्युकेशन, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे दोन वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी) **(परिशिष्ट 'अ' व 'ब')** अशी प्रवेश पात्रता असून पदव्युत्तर अभ्यासक्रमांना 10+2+3 किंवा समकक्ष याप्रमाणे प्राप्त केलेली मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असण्याबाबत युजीसी यांचे निर्देश **(परिशिष्ट 'क')** येथे जोडण्यात आले आहेत.

2) महाराष्ट्र शासनाच्या दि.02/01/2018 न्वये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.14/10/2013 रोजीच्या पत्रानुसार कार्यवाही करणेबाबत कळविले असलेने दूरशिक्षण अंतर्गत प्राप्त पदवीस युजीसी, डीईसी/ डीईबी यांच्या जॉईंट कमिटीची मान्यता असलेस त्याच पदव्या पुढील प्रवेशाकरिता ग्राह्य धरण्यात याव्यात. तसेच यासंदर्भातील विद्यापीठ अनुदान आयोगाचे दि. 11/03/2015 च्या अधिसुचनेनुसार कार्यवाही करणेत यावी.

3) डीईसी/ डीईबी ची मान्यता नसलेल्या अन्य विद्यापीठातून व्यावसायिक किंवा तत्सम अभ्यासक्रम दूरशिक्षण अंतर्गत पूर्ण करून आलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी प्रवेश दिल्याचे निदर्शनास आलेस व नंतर अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाने अपात्र ठरविल्यास यातून काही कायदेशीर प्रकरणे उद्‌भवली तर यास सबंधित महाविद्यालय जबाबदार राहील व यासंदर्भातील न्यायालयीन खर्च महाविद्यालयास आकारला जाईल याची नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात या कार्यालयाचे दि. 11/06/2012 चे परिपत्रक विचारात घेणेत यावे. याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

4) युजीसी मान्यताप्राप्त केंद्रीय, राज्य, खाजगी व अभिमत विद्यापीठांची यादी **(परिशिष्ट 'ड')** जोडली आहे. यु.जी.सी.चे यांचे नोटिफिकेशननुसार कोणत्याही विद्यापीठास त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर संलग्न महाविद्यालय किंवा अभ्यासकेंद्र सुरू करता येणार नाही. आतापर्यंत यु.जी.सी ने कोणत्याही विद्यापीठास त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर संलग्न महाविद्यालय किंवा अभ्यासकेंद्र सुरू करण्यास परवानगी दिलेली नाही. तेव्हा या सर्व बाबींची माहिती घेऊन विद्यार्थी व पालक यांनी प्रवेश घ्यावयाचा आहे.

तेंव्हा उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन यु.जी.सी मान्यताप्राप्त नसलेल्या विद्यापीठांची किंवा दूरशिक्षण अंतर्गत व्यावसायिक किंवा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेतील पदवी घेऊन प्रवेशासाठी येणा–या विद्यार्थ्यांबाबत सर्व महाविद्यालयांनी अधिक दक्ष राहून अशा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

**C. व्यावसायिक अभ्यासक्रम व केंद्रीय प्रवेश पदधती असणा–या अभ्यासक्रमाबाबत विशेष सूचनाः–**

1) केंद्रीय प्रवेश पध्दतीने प्रवेश होणा–या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, फार्मसी, आर्किटेक्चर, एम.बी.ए, एम.सी.ए., शिक्षणशास्त्र, विधी) प्रवेश पात्रता अर्ज विद्यापीठात सादर करताना प्रवेश नियंत्रण समिती (डी. टी. ई.) यांच्याकडून प्रवेश अंतिम झालेल्या मान्यतापत्र याद्या पाठविणे बंधनकारक राहील. त्यानंतरच त्यांच्या पात्रता मंजूर केल्या जातील. तथापि, विद्यापीठाचे प्रवेश पात्रता अर्ज व शुल्क विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे.

2) अभियांत्रिकी विद्यार्थ्याचे (द्वितीय वर्ष पातळीवर) शाखाबदल संदर्भात दरवर्षी स्वतंत्रपणे परिपत्रक संलग्न महाविद्यालयांना पाठविण्यात येते. तेव्हा अभियांत्रिकी महाविद्यालयांनी त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**D. <u>परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत :</u>**

पदवी, पदव्युत्तर व एम.फील/पी.एच.डी. या अभ्यासक्रमास प्रवेश घेणा–या परदेशी विद्यार्थ्यांसाठीची नियमावली सोबत जोडली असून त्यानुसार परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत पुढील कार्यवाही करावी, तसेच यासंदर्भात काही शंका असल्यास Director, International Affair Cell (contact No. 0231-2609165, email Id dir.iac@unishivaji.ac.in) यांचेशी संपर्क साधावा.

**E. <u>दुहेरी पदवी योजनेअंतर्गत अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याबाबत सूचनाः–</u>**

नियमित अभ्याक्रमाबरोबर दूरशिक्षण अंतर्गत पदविका अभ्यासक्रमास प्रवेशघेण्याबाबतचा दंडक 78 सुधारित करणेची कार्यवाही सुरू असून याबाबत आपणांस स्वतंत्र परिपत्रकान्वये कळविण्यात येईल.

**F. <u>पात्रता अर्ज प्रकियेबाबत व विद्यापीठाकडे अर्ज पाठविण्याबाबत संबंधित महाविद्यालयाच्या कार्यालयाकरिता सूचना :–</u>**

1) सर्व प्रवेशीत विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज अभ्यासक्रम निहाय बॉक्स फाईल अथवा लेस फाईलमध्ये योग्य रितीने आडनावाच्या अद्याक्षराप्रमाणे अर्ज लावावेत फाईल करुन द्यावेत. सोबत प्राचार्यांचे कव्हरींग लेटर, शुल्काची पावती जोडावी. सोबत विद्यार्थ्यांच्या नावाची यादी आडनावाच्या आद्यअक्षराप्रमाणे तीन प्रती मध्ये पाठवावी.

2) पात्रता अर्जासोबत संबंधीत अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने संलग्नता मंजूर केलेल्या पत्राची प्रत तसेच नवीन विषय, नवीन तुकडी, नवीन विद्याशाखा, वाढीव विद्यार्थी संख्या याबाबत विद्यापीठाने मंजूर केलेली त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या पत्राची प्रत जोडावी.

3) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक 1898 (197/98) द्वमाशि – 1 दि. 24 जून 1999 च्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्याकडून प्रथम गुणपत्रिका, प्रमाणपत्रे यांच्या छायांकित प्रती स्विकाराव्यात व प्रत्यक्ष प्रवेश देताना मुळ गुणपत्रिका व प्रमाणपत्रे यांच्या सत्यतेबाबत पडताळणी करून यावर प्राचार्यांनी/विभागप्रमुखांनी सही करावी. मूळ गुणपत्रिका, प्रमाणपत्रे इत्यादी विद्यार्थ्यास लगेच परत करावीत. याबाबतही अनेक महाविद्यालये/पदव्युत्तर अधिविभाग विद्यार्थ्याचे मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्रे कार्यालयाकडे ठेऊन घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. तेव्हा शासन परिपत्रकानुसार (दि. 12/12/2006) नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. काही शंकास्पद परिस्थितीत

मुळ गुणपत्रिका, प्रमाणपत्रे रोखण्यात येवून त्याच्या सत्यतेबाबत महाविद्यालयाने पडताळणी करावी.

**4)** सर्व वर्गाच्या आवश्यकतेप्रमाणे साक्षांकित स्वयंस्पष्ट गुणपत्रिकेच्या प्रती जात पडताळणीच्या आवश्यकतेप्रमाणे दाखल्याची साक्षांकित प्रत पात्रता अर्जासोबत जोडाव्यात तसेच अपूर्ण कागदपत्राची पूर्तता विद्यापिठाने (ऑनलाईन /ऑफलाईन ) कळविले पासून 15 दिवसाच्या आत करण्यात यावी.

**5)** पदव्युत्तर परीक्षेबाबत पात्रता अर्जात पदवीच्या विषयाचा अथवा स्पेशलायझेशनचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

**6)** पात्रतेच्या नियमानुसार ज्या अभ्यासक्रमांना राखीव कोट्यातून प्रवेश दिला जातो. त्या विद्यार्थ्यांचे गुणांच्या टककेवारीची खात्री करुन आवश्यक त्या ठिकाणी त्याचा जातीचा दाखला / जात पडताळणी प्रमाणपत्राचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

**7)** प्राचार्य / संचालक /अधिविभाग प्रमुख यांचे दंडक क्र. 22 कडे लक्ष वेधण्यात येते. या दंडकानुसार ज्या विद्यार्थ्यांनी पहिले सत्र समाप्ती पूर्वी आपले पात्रता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही त्यांची सत्रे मान्य करण्यात येणार नाहीत तसेच ज्या विद्यार्थ्यांनी प्रचलित नियमानूसार महाविद्यालयात प्रवेश घेवूनही प्रथम सत्र समाप्ती पूर्वी पात्रता केलेली नाही अशा विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करावेत त्यांना पूढील वर्गात प्रवेश देवू नयेत.

**8)** विद्यार्थ्याच्या वर्गवारीनुसार व विद्यार्थ्याच्या संख्येनूसार पात्रता शुल्क भरल्याची खात्री करावी. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्याकडून जमा झालेली पात्रता प्रमाणपत्राच्या शुल्काची रक्कम प्राचार्य अथवा संचालक यांना महाविद्यालयाकडे ठेवता येणार नाही याची नोंद घ्यावी. या कार्यालयास विहीत तारखेपूर्वी विहित शुल्क जमा करणे आवश्यक आहे.

**9)** एखाद्या विद्यार्थ्याचा शाखा बदल (अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त) करण्यात आला असल्यास प्रथम सत्रातच विद्यापीठास कळवावा.

**10)** पात्रता अर्ज विद्यापीठात सादर करताना शक्यतो काम करणा–या संबंधित कर्मचा–यासोबतच पाठवून द्यावेत. विद्यार्थांच्या प्रवेशपात्रतेबाबत काही शंका असल्यास 0231–2609137 / 2609138 या फोनवर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

**11)** अन्य विद्यापीठ / बोर्डाच्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज स्वतंत्र मुखपत्रासह फाईलमधून पाठविणेत यावेत.

**कुलसचिव**